14 NOV 2021 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एनसीसी गट मुख्यालयाचा पाणीप्रश्न सोडवण्यास सहकार्य

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी घेतली सदिच्छा भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

एनसीसी कोल्हापूर गट मुख्यालयाला छात्रसैनिकांच्या शिबिरावेळी भेडसावणारा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी शिवाजी विद्यापीठ सर्वतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी गुरुवारी एनसीसी गट मुख्यालयाचे नूतन प्रमुख ब्रिगेडियर समीर साळुंखे यांना दिली.

एनसीसीच्या कोल्हापूर गट मुख्यालयाची प्रमुख म्हणून सूत्रे हाती घेतल्यानंतर ब्रिगेडियर साळुंखे यांनी कुलगुरूंची सदिच्छा भेट घेतली. यावेळी ट्रेनिंग ऑफिसर लेफ्टनंट कर्नल सुनीलकुमार व ऑनररी मेजर प्रा. डॉ. रूपा शहा यांची उपस्थिती होती.



**कोल्हापूर : ब्रिगेडियर समीर साळुंखे यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची सदिच्छा भेट घेतली. सोबत लेफ्टनंट कर्नल सुनीलकुमार व मेजर प्रा. डॉ. रूपा शहा.**

यावेळी शिवाजी विद्यापीठ पाण्याबाबत आत्मनिर्भर आहे; पण विद्यापीठाच्याच आवारात असलेल्या एनसीसी गट मुख्यालयाला कॅम्प सुरू असताना बाहेरून टँकरने पाणी विकत घ्यावे लागते. या प्रश्नाकडे ब्रिगेडियर साळुंखे यांनी कुलगुरूंचे लक्ष वेधले.

अडथळा शर्यतीसाठीचे मैदान विकसित करताना शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा संकुलाचा भाग म्हणून ते विकसित केले जाईल. विद्यापीठाशी समन्वय ठेवून एनसीसी या मैदानाचा छात्रसैनिकांसाठी उपयोग करून घेऊ शकेल, असेही कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी ब्रिगेडियर साळुंखे यांनी कुलगुरूंना पुष्पगुच्छ दिल्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांना ग्रंथभेट दिली. ऑनररी मेजर प्रा. डॉ. रूपा शहा यांनीही 'अंगारझळा आणि दिलासा' हे पुस्तक मान्यवरांना भेट दिले.

14 NOV 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पर्यटनस्थळांच्या इतिहासाचे होणार संकलन

## शिवाजी विद्यापीठाचा प्रकल्प : शासन निधी उपलब्ध, पर्यटन विकासाला मिळणार गती



ओंकार धर्माधिकारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : जिल्ह्यातील पर्यटनस्थळांचा इतिहास संकलित करून त्यांची विविध भाषांतील पुस्तिका बनवणे तसेच या पर्यटनस्थळांच्या विकासासाठी योजना आखणे हा प्रकल्प शिवाजी विद्यापीठाला मिळाला आहे. या अंतर्गत किल्ले, धार्मिक स्थळे, ऐतिहासिक ठिकाणे, नैसर्गिक सौंदर्यस्थळे यांची माहिती संकलित केली जाणार आहे. यासाठी विद्यापीठाने एक समिती बनवली असून शासनाने या प्रकल्पासाठी ५० हजारांचा निधीही मंजूर केला आहे.

जिल्ह्यातील पर्यटनाचा विकास करण्यासाठी व्यापक आराखडा बनवण्याचे काम सुरू आहे. यासाठी समाजातील विविध घटकांचे मार्गदर्शन घेतले जात आहे. त्याचबरोबर जिल्ह्यातील फारशी प्रसिद्ध नसलेले पर्यटनस्थळे प्रकाशात आणण्यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. जी पर्यटनस्थळे प्रसिद्ध आहेत ती अधिक आकर्षकपणे देशभर पोहचवणे यासाठी विविध प्रकल्प सुरू केले आहेत. यातील एक प्रकल्प शिवाजी विद्यापीठाकडे सोपवला आहे. या अंतर्गत नवीन पर्यटनस्थळे शोधणे, त्यांची मार्गदर्शक पुस्तिका बनवणे, तिचे विविध भाषांत भाषांतर करणे, पर्यटनस्थळांजवळ माहिती फलक उभे करणे, अशी विविध कामे या प्रकल्पांतर्गत केली जाणार आहेत. यामुळे पर्यटन विकासाला गती मिळेल.

### प्रकल्प अधिकारी असे

- प्रकल्प प्रमुख - डॉ. अविनाश पाटील (इतिहास अधिविभाग)
- प्रकल्प साहाय्यक - प्रा.डॉ.नंदकुमार मोरे (मराठी अधिविभाग)
- डॉ. नीलांबरी जगताप (समन्वयक, छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र)
- डॉ. मीना पोतदार (भूगोल अधिविभाग) व १० संशोधक विद्यार्थी

### या पर्यटनस्थळांचा होणार अभ्यास

- कोपेश्वर मंदिर, खिद्रापूर • पन्हाळा • विशाळगड-पावनखिंड
- पोहाळे गुहा • गगनबावडा - पळसंबे मंदिरे • असळज वीरगळ
- सांगशी शिलालेख • राधानगरी-चक्रेवाडी • पारगड
- महिपालगड • कलानिधीगड • नेसरी • सामानगड

### प्रकल्पाचे स्वरूप असे

- पर्यटनस्थळांना भेटी देऊन त्यातील पर्यटनयोग्य जागांची अभ्यास करून निश्चिती करणे.
- निवडलेल्या पर्यटनस्थळांची विविध भाषांत माहितीपर टिपणी करणे.
- या स्थळांमधून जिल्हाधिकारी कार्यालयातून निश्चित केलेल्या ठिकाणांची दीर्घकालीन माहिती बनवणे.
- प्रत्येक क्षेत्रवार माहिती पुस्तिका बनवणे.
- निवडलेल्या मार्गदर्शकांची (गाईड) कार्यशाळा घेणे.
- या पर्यटनस्थळी चित्रे, शिल्पे यासाठी संकल्पना ठरवणे.
- ऐतिहासिक प्रसंग दाखवण्यासाठी साउंड अँड लाईट शोची संकल्पना करणे.

" कोल्हापूरला ऐतिहासिक, धार्मिक वारसा लाभला आहे. निसर्गसौंदर्याने नटलेला परिसरही विपुल आहे. या प्रकल्पांतर्गत या सर्व ठिकाणांचा वास्तवदर्शी इतिहास संकलित होणार आहे. त्यातून या पर्यटनस्थळांची समाजाला नव्याने ओळख होईल. देशोदेशीचे पर्यटक इथे हा इतिहास समजावून घेण्यासाठी येतील.

- डॉ. अविनाश पाटील, प्रकल्प अधिकारी.

14 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एक्सआरडी प्रशिक्षण कार्यशाळा

## नामांकित संशोधकांचा सहभाग; उपकरणांच्या तांत्रिक माहितीसह प्रात्यक्षिके





**कोल्हापूर : एक्सआरडी कार्यशाळेत बोलताना प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. आर. कलश आदी.**

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : विद्यापीठातील सैफ सुविधा केंद्राच्या माध्यमातून दोन दिवसांची एक्सआरडी प्रशिक्षण कार्यशाळा झाली. एक्सआरडी उपकरणाची तांत्रिक व प्रात्यक्षिक अशी सखोल माहिती दिली. प्रात्यक्षिकही करवून घेतले. या विषयातील देशभरातील नामांकित संशोधक, अभियंते आणि संशोधक या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

कार्यशाळेचे उद्‌घाटन कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली सल्लागार डॉ. एस. एस. कोहली यांची ऑनलाइन उपस्थिती होती. दोन दिवसांच्या प्रशिक्षण कार्यशाळेत ब्रूकर कंपनीचे ॲप्लिकेशन इंजिनिअर डॉ. रविकुमार यांनी एक्सआरडी उपकरणाची तांत्रिक व प्रात्यक्षिक अशी सखोल माहिती देत त्याचे प्रात्यक्षिकही करवून घेतले. त्याचबरोबर रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. भांगे यांनीही एक्सआरडी विश्लेषणात महत्त्वपूर्ण असणाऱ्या सॉफ्टवेअरबद्दल माहिती आणि प्रात्यक्षिक दिले.

आज कार्यशाळेची सांगता झाली. प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, "आयआयटी मुंबईने सैफ केंद्रांसाठी तयार केलेल्या वेबपोर्टलचे माध्यमातून विद्यापीठाच्या सैफ केंद्रातील वैज्ञानिक संशोधन सुविधा संशोधकांना वापरणे सोपे होणार आहे. युजरफ्रेंडली असणारे हे पोर्टल सैफ आणि त्याचे वापरकर्ते तसेच डीएसटी आणि सैफ केंद्र यामधील संवाद सुलभ आणि परिणामकारक होण्यासाठी खूपच फायदेशीर आहे. संशोधनाच्या दृष्टीने इतके महत्त्वपूर्ण असणारे हे वेबपोर्टल शिवाजी विद्यापीठातील सैफ ला सीफसी विभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे आयआयटी मुंबई कडून उपलब्ध झाले आहे ही खूपच मोठी आणि आनंदाची गोष्ट आहे. यामुळे सैफ सुविधांचा वापर अजून वाढून उत्तम संशोधनास अजूनच वेग येईल याची खात्री वाटते."

यावेळी सैफ केंद्र पंजाब विद्यापीठ चंदीगढ चे डॉ. रमेश कुमार शर्मा व सैफ केंद्र, आयआयटी मुंबईचे डॉ. जी. एस. सैनी यांनी तिथले सैफ केंद्र आणि उपलब्ध उपकरणांबद्दल ऑनलाईन प्रेझेंटेशनद्वारे माहीती करून दिली. या कार्यशाळा- प्रशिक्षणात जवळपास ७५ संशोधक विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी होऊन उत्साही प्रतिसाद दाखवला. विज्ञानशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.